Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume - IX, Issue - II,
April - June - 2020
Marathi / Hindi Part - II

Impact Factor / Indexing
2019 - 6.399
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

# CONTENTS OF MARATHI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १३ | जागतिकीकरणाचा मराठी विाान साहित्यावरील प्रभाव<br>**प्रा. डॉ. वंदना लव्हाळे** | ७५-७९ |
| १४ | जागतिकीकरण आणि भारतीय संविधान<br>**प्रा. विलास एस. टाले** | ८०-८५ |
| १५ | जागतिकीकरणात अभिव्यक्त झालेली : आंबेडकरी कविता<br>**प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम** | ८६-९० |
| १६ | ग्रामीण कर्जबाजारीपणाची समस्या - कारणे व दुष्परिणाम<br>**प्रा. डॉ. अरुण उखा पाटील** | ९१-९४ |
| १७ | मराठी भाषिक कौशल्ये<br>**प्रा. डॉ. राजेंद्र गुलाब काकुस्ते** | ९५-९९ |


# CONTENTS OF HINDI PART - II


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | भूमंडलीकरण और नारी सशक्तीकरण<br>**श्रीमती नीतू भूषण तातेड** | १-४ |
| २ | दलित आत्मकथा 'गैं गमैन' में मजदूर वर्ग के परिप्रेक्ष्य में विवेचनात्मक अध्ययन<br>**प्रा. राजेंद्र ज्ञानदेव ननावरे** | ५-९ |
| ३ | ओमप्रकाश वाल्मीकि की कहानियों में दलित चित्रण ('सलाम' कहानी संग्रह के संदर्भ में)<br>**डॉ. कृष्णात आनंदराव पाटील** | १०-१४ |

VOLUME - IX, ISSUE - II - APRIL - JUNE - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# १७. मराठी भाषिक कौशल्ये

**प्रा. डॉ. राजेंद्र गुलाब काकुस्ते**
मराठी विभाग प्रमुख, विद्या विकास मंडळ साक्री, संचलित कला, वाणिज्य महाविद्यालय, अक्कलकुवा, जि. नंदुरबार.

प्रास्ताविक

निसर्गाने मानवाला सर्व साजिवांपेक्षा एक निराळी कला वरदान म्हणून दिली आहे. ती म्हणजे मानवाला बोलता येणे होय. हे त्यांचे निराळेपण आहे. जन्माला आल्यानंतर काही काळानंतर बाळ बोलायला शिकते. त्याचे कारण म्हणजे ते मूल त्याच्या आसपासच्या वातावरणातील मोठ्यांचा बोलण्याचे अवलोकन व अनुसरण करते. सर्वप्रथम त्याचा संबंध आपल्या आईशी जास्त येतो. जेव्हा काही बोलत असते. तेव्हा तिच्या बोलण्यातून ऐकायला येणारे शब्दांचे आवाजावरून तसेच ध्वनी पुन्हा उच्चारण्याचा प्रयत्न करत करत ते मूल शब्द उच्चारायला शिकते. त्यानंतर अवतीभोवती इतर बोलणाऱ्या व्यक्तींच्या बोलल्या जाणाऱ्या भाषेतील शब्दांचे अनुकरण करून बोलण्याचा प्रयत्न करू लागतो. त्यातूनच त्या वातावरणात बोलली जाणारी भाषा हे मूल अवलोकन व अनुकरणातून शिकते.

मानवाच्या जीवनाचा अविभाज्य भाग म्हणजे त्यांची भाषा होय. भाषेद्वारा तो आनंद दुःख व्यक्त करतो, प्रेम व्यक्त करतो, रागवतो, भाषण संभाषण करतो म्हणजेच तो मनातील विचार भावना आपल्या बोलण्यातून व्यक्त करतो. भाषा हे मानवाच्या मनातील विचार भावना व्यक्त करण्याचे प्रभावी साधन आहे. भाषेमुळे मानवाला जगाची ओळख करून घेता येते. भाषा परिवर्तनशील लवचिक असते. म्हणूनच गरजेनुसार आपण भाषेला बनवतो. म्हणजे तिला आकार देतो, भाषा वापरणारी व्यक्ती त्याच्या गरजेनुसार वापर करतो. वावरत असणाऱ्या क्षेत्रानुसार तो कारणानुसार तिचा वापर करतो. मानवाला अनेक भाषांचा वापर करता येणे म्हणजेच तो बहुभाषिक असं होय. त्याचा कार्य भाग साधण्यासाठी त्याला त्याचा बहुभाषिक असण्याचा फायदा होतो. तसेच भाषेमुळे मानवाला आत्मविश्वास बळावतो म्हणूनच बहुभाषिक माणूस हा आपले विचार व भावना सर्वदूर पोहोचत असतो. भाषा ही अभिव्यक्तीचे प्रभावी साधन असते. भाषेचा प्रभावी व आत्मविश्वासपूर्ण वापरासाठी प्रभावी मूलभूत भाषिक कौशल्य आत्मसात केली पाहिजेत.

भाषण कौशल्यभाषेवर प्रभुत्व मिळवण्यासाठी काही प्रमुख भाषिक कौशल्य आत्मसात करणे महत्त्वाचे असते. व्यवहारात त्यांच्या वापर करता आला पाहिजे. भाषिक व्यवहार मग तो कोणत्याही प्रकारचा असला तरी तो सार्थ अभिप्राय आणि परिणामकारक करता यावा. यासाठी आपल्याकडे भाषण कौशल्य आत्मसात केली असली पाहिजेत. काही महत्त्वाचे भाषिक कौशल्य असे सांगता येतील.

1. श्रवण

भाषा ही सहयोगी असते परस्परांमध्ये होणार सहयोग व सहकार्यासाठी भाषा विनिमयाचे महत्वाचे साधन असते. मानवाच्या अंगी असणाऱ्या बौद्धिक कौशल्यामुळे गरजेनुसार असतो. आपल्या भाषेचा विकास साधत असतो. समाजातील सभोवताल त्या परिस्थितीनुसार त्याची जडणघडण होत असते. श्रवणाचे महत्त्व भाषिक संस्कारात फार महत्त्वाचे आहे. बोलता येणे या क्रियेचा संबंध श्रवणाशी अधिक असल्याने लहान मूल प्रथम आईच्या संपर्कात अधिक येते. ती बोलते, त्या शब्दांचे अनुकरण करून तसे शब्द उच्चारायचा प्रयत्न करते. त्यांच्या संपर्कात आलेल्या कुटुंबातील इतरांशी आलेल्या संपर्कामुळे अधिकाधिक शब्द कानीपडू लागल्याने तो अधिकाधिक शब्द शिकत ते शब्द बोलू लागतो. म्हणजेच ते मूल बोलायला शिकते. ते प्रथम श्रवणामुळे, श्रवणातून शब्दाचे उच्चार रस्व, दीर्घ, लय या बाबींचे अनुकरण करून बोलायला शिकते. मोठे होत जाणाऱ्या मुलांचा संपर्क कुटुंब, मित्र, परिसर, शाळा , महाविद्यालय समाज अशा पद्धतीने वाढतो. त्यामुळे भोवतालच्या अनेक विविध गोष्टीत वस्तू, प्राणी, पक्षी त्यांचे विविध रंग, आकार, आवाज इत्यार्दी बरोबर मानवाच्या बोलण्याचा पद्धती विचार, कल्पना यांचे आकलन श्रवणातून होत असते. त्यामुळे भाषिक जाण विकसित होते. दैनंदिन जीवन व्यवहारातील सहज बोलण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या भाषेची तयारी सहजपणे कळत नकळत श्रवणातून घडते. म्हणजेच भाषिक अभ्यासात श्रवण हा महत्वाचा घटक होय.

2. वाचन

भाषिक व्यवहारात वाचनाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. 'वाचाल तर वाचाल' हे वाचनातील संदेश महत्त्वाचा मानला जातो. कारण वाचनामुळे व्यक्तीच्या व्यक्तिमत्वात वाढ होते. तो बहुश्रुत होतो. विचार प्रगल्भ होतात. साहित्य निर्मिती प्रक्रिया साहित्यिकाला ग्रंथ निर्मितीसाठी अनुभवातून मिळालेल्या ज्ञानाबरोबर इतर साहित्यकांचे साहित्याचे वाचन करून, आपले ज्ञान वृद्धिंगत करणे गरजेचे असते. साहित्य वाचून आपला अनुभव समृद्ध होतो. ग्रंथ हे केवळ ज्ञानात भर घालतात असे नव्हे, तर समाजातील माणसे वाचायला शिकवतात. चांगले ग्रंथ वाचनामुळे मानवी जीवन जाणीवा समृद्ध व सुसंस्कारित होतात. कल्पनाशक्तीला नवीन धुमारे फुलतात. भाषा समृद्ध होते. व्यवहारात बोलण्यासाठी संवाद साधता येणे पुरेसे असते. तरी बोलण्यासाठी व्याख्यान देण्यासाठी वक्त्याला वेगळी तयारी करावी लागते. त्यासाठी त्याला वाचन करणे गरजेचे असते. वाचनाने विचार क्षमता वाढते. कल्पनाशक्ती विकसित होते. शब्दसंग्रह वाढल्याने समर्पक शब्द वापरण्याची जाणीव निर्माण होते. नवीन नवीन शब्दांचा परिचय. म्हणी वाक्प्रचार यांची माहिती होते वाचनाने भाषिक दृष्ट्या माणूस संपन्न होत जातो.

वाचन दोन प्रकारे करता येते. एक मनातल्यामनात मौन वाचन करणे. तर दुसरा प्रकार प्रकट वाचन करणे. हे मनातल्या मनात केवळ डोळ्यांनी कोणत्या वाचनात एकाग्रता साधली जाते. असे असले तरी प्रत्येकाच्या आपल्या क्षमतेनुसार त्या मजकुराचे आकलन होते. तर प्रकट वाचन शब्द उच्चार

आवाजाचे चढ-उतार आघात, विराम यांना महत्त्व असते. कधीकधी म्हणून वाचनाने आकलन न झालेला विषय प्रकट वाचनने समजून घेता येतो. उच्चारातील स्पष्ट कळते. उच्चारातील दोष कळल्यामुळे उच्चारणात सुधारणा करता येते. प्रकट वाचनामुळे शब्दाचा अर्थ त्यातील भावना, विचार, कल्पना लवकर समजतात मनातल्या मनात वाचन केल्याने एखाद्या मजकुरातील भावना, संवेदना या हृदयापर्यंत पोचतील असे नाही. प्रकट (मोठ्याने) वाचन केल्यास शब्दांच्या उच्चारण साधता येतो. जेथे शब्दांची लय, ताल या गोष्टी ती प्रकट वाचन आणि लक्षात आल्याने वाचकाला वाचनाचा आनंद घेता येतो. वाचन हा घटक भाषेत भाषेत कौशल्याच्या विकासात महत्त्वाचा ठरतो.

3. लेखन

भाषिक कौशल्य विकास लेखन कौशल्य आत्मसात करणे. याला अधिक महत्त्व असते. कारण लेखन कौशल्य हे मनातील भाव व्यक्त करण्याचे महत्त्वपूर्ण माध्यम आहे. लेखन म्हणजे बोललेले ऐकलेले लिपीच्या माध्यमातून शब्दांकित करणे होय. केलेले लिखान हे दीर्घकाळ टिकते. त्याच लिखाणाला पुढच्या काळात लिखित दस्तऐवज म्हणून महत्त्व प्राप्त होते. म्हणून कोणतेही लेखन हे जबाबदारीने व काळजीपूर्वक केले पाहिजे. उच्चारलेले शब्द, झालेली चूक, दुरुस्त करता येते. पण लिखित शब्दातील चूक कायम पुरावा होतो. म्हणून या कौशल्याला फार महत्त्व असते. साहित्याचे काही प्रकार सांगता येतात. उदा. ललित, साहित्य, शास्त्रीय साहित्य, वैचारिक अभिव्यक्ती, कार्यालयीन पत्रव्यवहार, वैयक्तिक पत्रव्यवहार इत्यादी लेखन करतात. लेखन करताना तो का लिहितो? कोणासाठी लिहितो? त्याची लेखनाचे उद्दिष्ट कोणते? इत्यादी बाबींचा विचार करावा लागतो. लिखाण हे आकर्षक समर्पक परिणामकारक असेल तर ते वाचकांच्या मनाची पकड घेतो. शब्द हेच लेखनात वाक्यरचनाचे साधन असते. कथा, कादंबरी, कविता, नाटक, चरित्र-आत्मचरित्र, ललित गद्य इत्यादींसारखे प्रकारातून वैविध्यपूर्ण लेखन करता येते. सुलेखन, शुद्धलेखन, समर्पक लेखन असा भाषिक विकास लेखना मुळेच साधता येतो.

लेखन हे लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब असते. म्हणून साहित्य हा मानवी जीवनाचा आरसा असतो असे म्हटले जाते. लेखकाचा व्यासंग, अनुभव, विचार, कल्पनाशक्ती, सौंदर्यदृष्टी, भावनात्मकता, चिंतनशीलता यांचा एका परिपाक म्हणजेच लेखन. तसेच ते समर्पक सुसंगत परिणामकारक व अर्थवाही असावे. विषयानुसार लेखन पद्धती बदलतात. बदलत्या काळानुसार लिखाणाचे स्वरूप बदलू लागले. म्हणूनच कार्यालय लेखनाचे महत्त्व लक्षात घेतले जाते. त्यासाठी शासकीय, निमशासकीय कार्यालय, सहकारी संस्था मंडळे, कार्यालयीन पत्र व्यवहार, निविदा, सूचना, परिपत्रके या संदर्भातील लेखनाचा परिचय असणे आवश्यक आहे. तसेच उद्योगधंदे, व्यवसाय, बँका यातील पत्र व्यवहार करता येणे आवश्यक असते. त्यासाठी लेखन कौशल्य आत्मसात करणे गरजेचे आहे. तसेच आपले विचार मर्यादित शब्दात अशा पद्धतीने मांडता येण्यासाठी लेखन कौशल्य विकसित करणे आवश्यक आहे. लेखन चांगले होण्यासाठी

सर्वप्रथम आपले लेखन शुद्ध हवे मांडणीत आकर्षकता व अर्थवादी शब्दांची केलेली रचना असेल तर ते लेखन परिणामकारक व आकर्षक होते.

**4. भाषण**

भाषणे भाषिक कौशल्य ते एक महत्त्वाचे कौशल्य आहे. भाषण करताना वक्ता जेव्हा आपल्या मनातील विचार मांडत असतो. तेव्हा त्याच्या समोर बसलेल्या श्रोतावर्ग त्याचे विचार ऐकत असतो. एक व्यक्ती बोलत असते आणि समोरचा समूह ऐकत असतो. अशा प्रसंगी बोलण्याला चे भाषण असे म्हणतात. भाषण प्रभावी होण्यासाठी आणि विचार व्यक्त करण्यासाठी भाषण करत याला भाषण प्रभुत्व हवे. त्याची भाषा शुद्ध बोल भाषा असावी. समोर बसले होते त्याच्या बौद्धिक वय आणि स्तर पाहत त्याप्रमाणे भाषा वापरली पाहिजे. अलंकारिक, संस्कृतप्रचुर, सारखे की विद्वतापूर्ण भाषा वापरण्यापेक्षा साधी सरळ श्रोत्यांना पचनी पडेल अशी भाषा वापरली पाहिजे. मैत्रीपूर्ण शैलीत संवाद साधताना आवाजात योग्य चढ-उतार, यामुळे भाषण ऐकताना श्रोत्याच्या मनात व त्याबद्दल आपलेपणाची भावना निर्माण होते. त्यामुळे भाषण प्रभावी व परिणामकारक होते. व त्याकडे समृद्ध शब्द संग्रह असावा. योग्य अर्थपूर्ण शब्दांचा वापर करता आला पाहिजे. विषयाबद्दलचे पुरेसे ज्ञान असावे अवजड शब्द न वापरता, साधी व सभोवती भाषा श्रोत्यांना खिळवून ठेवते. शब्दांची पुनरावृत्ती दिपू, अलंकार, विशेषणाचा अतिवापर, अनाठायी इंग्रजी शब्दांचा भडीमार या गोष्टी भाषणात टाळला गेल्या पाहिजेत. व त्याचे स्पष्ट शब्दोच्चार हे भाषण प्रभावी करतात. बोलत असताना व त्याचे फक्त मूक बोलत नाही तर त्याचे डोळे चेहऱ्यावरचे हावभाव हातवारे उभे राहण्याच्या पद्धती यातून वक्ता अभिव्यक्त होत असतो त्याच्या देहबोलीतून त्याचा आत्मविश्वास दिसतो. श्रोत्यांवर त्याच्या व्यक्तिमत्वाची छाप पडते. त्यामुळे भाषण प्रभावी होण्यास मदत होते. भाषण कौशल्य भाषण कौशल्य फार महत्वाचे असते.

**5. संभाषण**

खरे तर दैनंदिन व्यवहारात आपण एकमेकांशी जे बोलतो आपल्या मनातील भावना विचार कल्पना दुसऱ्याच्या मनापर्यंत पोहचत होतो. व त्याला त्या विषयाचे ज्ञान होते. एकूणच एकमेकांच्या बोलण्यात बोलण्यातून कार्यभाग साधला जातो त्याला संभाषण म्हणतात. कधी कधी चार चौघात होणाऱ्या गप्पांनाही आपण संभाषण म्हणतो. संभाषणही नोकरी-व्यवसाय कार्यालयीन कामकाज, सामाजिक कार्य, शासकीय व्यवहार इत्यादी अनेक ठिकाणी चर्चेच्या माध्यमातून घडत असते. संभाषणात एखादा विषय केंद्रस्थानी असतो. त्यात बोलणाऱ्याला मोकळीक असते. त्यामुळे एखाद्या विषयावर विस्तृत चर्चा होऊन, विषयाच्या सर्व बाजू स्पष्ट होऊन, योग्य निर्णय होऊ शकतो. संभाषणात फोनवरचे बोलणे असो, व्यवसायातील महत्त्वाचा विभाग, कार्यालयातील सहकाऱ्यांची विचारविनिमय असो, वरिष्ठांशी आत्मविश्वास आणि संभाषण करता आले पाहिजे. स्पर्धेच्या जगात यशस्वी होण्यासाठी उत्तम संवादकौशल्य वक्तृत्व कौशल्य आवश्यक आहेत.

वरील सर्व भाषिक कौशल्य हे सर्व भाषा अभ्यासातून प्राप्त करून घेता येतील. अशी भाषिक कौशल्य आहेत. त्यांना अध्यापनात प्रयोगशीलता असायला हवे. सततच्या सरावाने व प्रत्यक्ष कृतीनेही कौशल्य आत्मसात करता येऊ शकतात. त्यासाठी आजच्या युगात मोठ्या प्रमाणात साधने उपलब्ध होत आहेत. त्याचा वापर करून भाषिक कौशल्य विकसित करता येतील.

निष्कर्ष

1. भाषा हेच व्यक्तीचे महत्वपूर्ण व समर्थ साधन आहे.
2. श्रवण वाचन लेखन भाषण संभाषण ही भाषेची मूलभूत भाषा कौशल्य आहेत.
3. श्रवण हा भाषिक संप्रेषण घडवणारा महत्वपूर्ण घटक आहे.
4. वाचनामुळे विचार प्रगल्भ होतात कल्पनाशक्ती विकसित होऊन माणूस बहुश्रुत बनतो.
5. लेखन कौशल्य हे मनातील भाव अभीव्यक्त करण्याचे महत्त्वाचे माध्यम आहे.
6. साधी सरळ भाषेतून संवाद साधत अशा नुसार आवाजातील योग्य उत्तराने श्रोत्यांशी संवाद साधता येणे यामुळे भाषण प्रभावी होते.
7. एका व्यक्तीच्या मनातील भावना विचार कल्पना योग्यता साधलेल्या संवादामुळे दुसऱ्याच्या मनापर्यंत पोचवण्याची क्रिया संभाषणामुळे घडते.
8. अशा अभ्यासाने शिक्षकांनी प्रयत्नाने प्रयोगशीलतेने व सरावाने भाषिक कौशल्य आत्मसात करून वाढवता येतात.


संदर्भ

१. संपादक- कैलास सार्वेकर उपयोजित मराठी, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, १९९५
२. संपादक- पृथ्वीराज तौर, भाषिक कौशल्य विकास, अथर्व पब्लिकेशन, २०१८
३. नसीराबाद ल. रा. ,व्यवहारिक मराठी, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००८
४. संभाजी राजे मोकाशी, रंजना नेमाडे , व्यवहारिक मराठी, शेतकरी साहित्य, इर्जिक परिषद, बारामती २०१०

ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal

# तिफण

वर्ष १२ वे अंक १ ला
एप्रिल, मे, जून २०२१



महामानव
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
अभिवादन विशेषांक

| | | |
|---|---|---|
| | कु . लीना निलकंठराव उराडे . | |
| 24 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सांसदीय लोकशाहीसंबधी विचार– प्रा. विठ्ठल चौधरी | 138 |
| 25 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे 'नवयान'– येवला ते नागपूर– डॉ. श्रीनिवास सातभाई | 145 |
| 26 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे वृत्तपत्रीय काय – प्रा.डॉ.राजेंद्र गुलाबराव काकुस्ते | 150 |
| 27 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे फाळणीविषयक विचार – डॉ. तीर्थराज कापगते. | 156 |
| 28 | डॉ. बी.बार. आंबेडकरांच्या विचारांचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील प्रभाव डॉ. आर.ए. फुलकर, प्रा.व्ही.पी. काटकर | 163 |
| 29 | डॉबाबासाहेबआंबेडकरांचेशेती व शेतकरी धोरण - प्रा.बालाजी रावसाहेब बोडके | 170 |
| 30 | आंबेडकरी चळवळ आणि दलित साहित्य - डॉ. मथुरा मेवाड | 174 |
| 31 | आंबेडकरी विचारांचा दलित साहित्यावरील प्रभाव - प्रा.डॉ. रामकिशन दहिफळे | 179 |
| 32 | **डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक चिंतन .– डॉ.अनमोल शेंडे** | 185 |
| 33 | **डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या वृत्तपत्रांची प्रासंगिकता एक चिकित्सक अध्ययन विकास गवई** | 191 |
| 34 | **डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा वृत्तपत्रीय प्रपंच – डॉ. युवराज धबडगे** | 198 |
| 35 | **पत्रकारिता आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर – डॉ. मोहन राजाराम कापगते** | 206 |



## डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे वृत्तपत्रीय कार्य


### प्रा.डॉ.राजेंद्र गुलाबराव काकुस्ते


**अ**व्वल इंग्रजीच्या काळात महाराष्ट्रातील अभ्यासकांना प्रेरणा देण्याचे काम वृत्तपत्रांनी केले आहे. बाळशास्त्री जांभेकरांनी वृत्तपत्रसृष्टीचा पाया घातला. नामवंत वृत्तपत्रकारांनी आपापल्यापरीने वृत्तपत्र सुरु केले. त्यातून जनजागृती व समाजप्रबोधनाचे कार्य केले. समाजातील जनतेला आधुनिक विचारांनी प्रभावित केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी पत्रकारिता सुरु करण्यापूर्वी काही निवडक पत्रकारांनी अस्पृश्यांचे प्रश्न वृत्तपत्रातून मांडले होते. त्या पत्रकारांना स्वराज्यापेक्षाही सामाजिक स्वातंत्र्याचा प्रश्न अधिक जवळचा वाटत असल्यामुळे समाजसुधारणा व त्यासाठी उभारलेली चळवळ यासाठी वृत्तपत्रातून लेखनाचा उद्देश होता. बाबासाहेबांनी समाज प्रबोधनाबरोबरच अस्पृश्यांच्या हक्कासाठी लढा उभारताना त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी 'मूकनायक' हे वृत्तपत्र सुरु केले. मूकनायक हे वृत्तपत्र अस्पृश्यांच्या मुक्तीसंग्रामाला वाचा फोडणारे व नवचैतन्य देणारे ठरले. त्यानंतर बहिष्कृतांच्या चळवळीच्या प्रचारासाठी 'बहिष्कृत भारत' हे वृत्तपत्र सुरु केले. त्यातून विचार–विनियम, बहिष्कृत वर्गाच्या कुलाबा जिल्हा परिषदेचे इतिवृत्त, सभांची माहिती, पत्रव्यवहार, आत्मपरिचय या बरोबरच 'आजकालचे प्रश्न' मांडले जावू लागले. बाबासाहेबांनी या वर्तमानपत्राचे वर्गणीदार व्हावे असे आवाहन करुन देखील फारसे वर्गणीदार न झाल्याने आर्थिक विवंचनेमुळे 'मूकनायक' हे वृत्तपत्र बंद पडले. 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत' हे दोन्ही वृत्तपत्रे बंद पडल्यानंतर 'जनता' हे वृत्तपत्र सुरु केले. हे वृत्तपत्र दिर्घकाळ चालले. 'गुलामाला तू गुलाम आहे असे सांगा, म्हणजे तो बंड करुन उठेल.' असे या वृत्तपत्राचे ब्रीदवाक्य होते. बाबासाहेबांनी सामाजिक व शैक्षणिक प्रश्नांएवढाच धर्मांतर या मुद्यावर आपले विचार प्रभावीपणे जनतामधून मांडले. पुढे जनता या वृत्तपत्राचे नामांतर करुन 'प्रबुद्धभारत' असे केले. बाबासाहेबांच्या निर्वाणानंतर इतर संपादकांनी हे वृत्तपत्र चालविले. पुढे प्रबुद्धभारत हे वृत्तपत्र रिपब्लिकन पक्षाचे मुखपत्रच बनले. संपादक मंडळ व राजकीय नेत्यांमध्ये बेबनाव झाल्याने हे वृत्तपत्र बंद पडले. असे असले तरी बाबासाहेबांचे वृत्तपत्रीय कार्य अस्पृश्यांच्या चळवळीत मोलाचे ठरते.

## प्रास्ताविक :

आधुनिक मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचा अभ्यास करतांना लक्षात येते की, अव्वल इंग्रजीच्या काळात महाराष्ट्रातील तत्कालिन सुषिक्षीत अभ्यासकांना प्रेरणा देण्याचे काम वृत्तपत्रांनीच केले आहे. मराठी वृत्तपत्रसृष्टीत लोकमान्य टिळक, गो.ग.आगरकर, शि.म.परांजपे, न.चिं.केळकर, कृ.प्र.खाडीलकर, कोल्हटकर इ. सारख्या नामवंत वृत्तपत्रकारांचीच नावे ठळकपणे दिसून येतात. वृत्तपत्र हे लोकजागृतीचे अत्यंत प्रभावी माध्यम आहे. असे मानणारे अस्पृश्य समाजाचे शाष्वत चित्रण आपल्या प्रभावी लेखणीने ठामपणे मांडणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्यांनी मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता, प्रबुद्ध भारत यासारखे वृत्तपत्र सुरू करून ते चालविले. त्यातून प्रभावी लेखन केले. समाजातील जनतेला जागे करून आपल्या विचारांनी प्रभावित केले. त्यांना अस्तित्वाची जाणीव करून दिली. असे असले तरी मराठी वाङ्मयाच्या इतिहासात 'पत्रकार आंबेडकर' म्हणून त्यांच्या पत्रकारितेची दखल पाहिजे तेवढी घेतली गेलेली दिसत नाही. काही निवडक अभ्यासक, मीमांसकांनी बाबासाहेबांच्या वृत्तपत्रीय कार्याचा अभ्यास थोड्याफार प्रमाणात केलेला दिसतो. त्यांच्या चरित्रकारांनी चरित्र ग्रंथात वृत्तपत्रासंबंधी दिलेली माहिती, दलित व अस्पृश्यांच्या चळवळी संदर्भात अत्यंत महत्त्वाची बाब मानली पाहिजे.

## उद्दिष्ट्ये :

1) अव्वल इंग्रजीच्या कालखंडातील पत्रकारितेचे कार्य अभ्यासणे.

2) सामाजिक प्रबोधनाच्या चळवळीत वृत्तपत्रांचे योगदान अभ्यासणे.

3) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारितेचा अभ्यास करणे.

4) दलित चळवळीसाठी वृत्तपत्रांचे लाभलेले योगदान अभ्यासणे.

5) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे पत्रकार म्हणून मराठी वृत्तपत्रसृष्टीला लाभलेले योगदान अभ्यासणे.

## गृहितके :

1) अव्वल इंग्रजीच्या काळात वृत्तपत्रांनी जनजागृतीचे व प्रबोधनाचे कार्य मोठ्या प्रमाणात केले आहे.

2) समाज प्रबोधनाच्या चळवळीत वृत्तपत्रांच्या माध्यमातून विविध वृत्तपत्रांनी जनजागृती व ज्ञान प्रबोधनाचे कार्य केले.

3) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सुरु केलेल्या मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता, प्रबुद्ध भारत या वृत्तपत्रांचा अभ्यास करता येईल.

4) दलित चळवळीत वृत्तपत्रांचे योगदान मोठ्या प्रमाणावर लाभलेले आहे.

5) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे पत्रकार म्हणून मराठी वृत्तपत्रसृष्टीला फार मोठे योगदान लाभले आहे.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकरपूर्व दलित पत्रकारितेचे स्वरूप :

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी 31 जानेवारी 1920 रोजी 'मूकनायक'चा पहिला अंक प्रकाशित केला. त्यापूर्वी शिवराम जानबा कांबळे (सोमवंशीय मित्र), गोपाळबाबा वलंगकर यांच्यासारखे काही अस्पृश्य समाजातील पत्रकार वृत्तपत्रातून लिखाण करत होते. साधारणतः त्यांच्या लिखाणामागची भूमिका ही समाजातील अस्पृश्यता नष्ट व्हावी, अस्पृश्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे, त्यांच्या उन्नतीसाठी ब्रिटीश सरकार व हिंदू समाज यांचे विनंती करुन मन वळविणे, वृत्तपत्राच्या माध्यमातून अस्पृश्यांच्या उत्थानासाठी त्यांच्या कर्तृत्वाची व अस्मितेची जाणीव करून देणे, सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक प्रष्नांचे महत्त्व समजावून देणे, हिंदू समाजातील सामाजिक दोष दाखवून अस्पृश्यांना सामाजिक गुलामगिरीची जाणीव करून देऊन त्यापासून मुक्तीसाठी प्रसंगी सामंजस्याने तर कधी लढा देऊन प्रयत्न करावेत. प्रसंगी इंग्रज सरकारला अर्ज विनंतीही करावेत. याबाबतची माहिती तत्कालीन वृत्तपत्रातून छापली जात असे. सामाजिक प्रबोधनाच्या या चळवळीत ह्या पत्रकारांना स्वराज्याच्या प्रष्नापेक्षा सामाजिक स्वातंत्र्याचा प्रष्न अधिक गरजेचा व तीव्रतेचा वाटत असे. त्यामुळे सामाजिक सुधारणा व प्रबोधन हाच त्यांच्या चळवळीचा आणि वृत्तपत्र लेखनाचा उद्देश होता.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची वृत्तपत्रे :

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी 1920 मध्ये मूकनायक, 1927 मध्ये बहिष्कृत भारत, 1930 मध्ये जनता आणि 1956 मध्ये जनतेच रूपांतर प्रबुद्ध भारत अशी चार वृत्तपत्रे सुरू केलीत. बाबासाहेबांच्या वृत्तपत्रांच्या बाबतीत डॉ. गंगाधर पानतावणे आपल्या 'पत्रकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर' या ग्रंथात म्हणतात की, ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाच्या 'मूकनायका'ने 'बहिष्कृत भारता'तील 'जनतेला 'प्रबुद्ध भारता'ची ओळख करुन दिली आणि महाराष्टात आणि मराठीत दलितांच्या पत्रसृष्टीला एक नवी दिशा व नवे सामर्थ्य प्राप्त झाले.''

### 1) मूकनायक :

हे वृत्तपत्र विचार मांडण्याचे व समाज प्रबोधनाचे प्रभावी साधन असते. म्हणूनच बाबासाहेबांनी आपल्या समाजाच्या प्रबोधनासाठी व आपले विचार मांडण्यासाठी स्वतःचे एक वृत्तपत्र असावे या विचारातूनच 'मूकनायक' हे वृत्तपत्र सुरू केले. हे वृत्तपत्र सुरू करण्याचे कारण असे की, इंग्रज सरकारने 1917 साली 'साऊथबरो कमिशन' हिंदूस्थानातील विविध जाती–जमातींची मताधिकाराविषयक चौकशी करण्यासाठी नेमले होते. या कमिशनने काही महत्त्वाच्या ठिकाणी जाऊन काही महत्त्वाच्या लोकांची साक्ष नोंदवून घेतली होती. परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकर सरकारी महाविद्यालयात प्राध्यापक असल्यामुळे त्यांना कमिशनने साक्ष देण्यासाठी निमंत्रीत केले नव्हते. कारण त्यांचा तोपर्यंत कोणत्याही सार्वजनिक व सामाजिक संस्थेशी संबंध नव्हता. तरीही त्यांनी अस्पृश्यांच्या हक्कासंबंधी काही मागण्या साऊथबरो

कमिशनकडे आपण कराव्यात या उद्देशाने गव्हर्नरकडे पत्रव्यवहार करून कमिशनपुढे साक्ष देण्याची विनंती केली व ती गव्हर्नरने मान्य केल्यावरं 'अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदार संघ' तसेच 'वार्षिक उत्पन्नाची अट न घालता निवडणुकीस उभे राहण्याचे स्वातंत्र्य' यासारख्या काही मागण्या कमिशनकडे केल्या. त्यांच्या लक्षात आले की, अस्पृश्यांच्या प्रश्नांना वाचा फोडणारे, त्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देणारे वृत्तपत्रे असावीत. त्यांच्या हिताची चर्चा करणारे, हिंदू धर्माच्या सामाजिक, मानसिक गुलामगिरीतून मुक्त करणारे व प्रबोधन करणारे एखादे वृत्तपत्र असावे या विचारातूनच 31 जानेवारी 1920 रोजी 'मूकनायक' हे पाक्षिक सुरू केले आणि समाजकारण व राजकारणात सक्रीय होण्याआधीच त्यांनी वृत्तपत्र सृष्टीत प्रवेश केला. मूकनायकचा जन्म हा अस्पृश्यांच्या मुक्तिसंग्रामाला नवचेतना देणारा ठरला. तसेच 'मूकनायक' हे अस्पृश्यांना विचार मांडण्याचे हक्काची एक जागा मिळाली. बाबासाहेब वृत्तपत्राकडे अस्पृश्यांना त्यांच्या अस्तित्वाची व भवितव्याची जाणीव करून देणारे साधन म्हणून पहात. 'मूकनायक' हे नाव फार अर्थपूर्ण होते. बाबासाहेबच अस्पृश्य, बहिष्कृत, मूक समाजाचे नेतृत्व करत होते. म्हणून हे नाव सार्थ वाटते. सुरुवातीच्या 12 अंकात बाबासाहेबांनी स्वतः अग्रलेख लिहीले होते. पण ते सिडनेहॅम या सरकारी महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम करीत असल्यामुळे त्यांनी पांडूरंग भटकर या सुशिक्षित अस्पृश्य तरूणांवर मूकनायकची संपादकाची जबाबदारी टाकली होती. बाबासाहेब. विलायतेला पुढील शिक्षणासाठी गेले. त्यांच्या मागे व्यवस्थापकीय मंडळीने जबाबदारीने काम पुढे चालू न ठेवल्यामुळे 1923 साली 'मूकनायक' कायमचे बंद पडले. बाबासाहेबांना त्यांनी सुरू केलेले वृत्तपत्र अल्पावधीतच बंद पडल्यामुळे खूप दुःख झाले.

**2) बहिष्कृत भारत :**

बाबासाहेबांनी दि. 3 एप्रिल 1927 रोजी सुरू केलेले दुसरे पाक्षिक होय. मार्च महिन्यात महाड येथे कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषदेचे अधिवेशन भरले तेव्हा बहिष्कृतांच्या चळवळीच्या प्रचारासाठी वृत्तपत्राची गरज वाटू लागली. या गरजेतून 'बहिष्कृत भारत' हे वृत्तपत्र सुरू केले. हे वृत्तपत्र महत्त्वाचे ठरले कारण बाबासाहेबांनी स्वतः अभ्यासपूर्ण लिखाण केले. फक्त एक जात किंवा वर्ग एवढ्यापुरता विचार न करता चळवळीचा सखोल अभ्यास करण्यासाठी ह्या वृत्तपत्रातील लिखाण महत्त्वाचे आहे. यात विचार–विनिमय, बहिष्कृत वर्गाच्या कुलाबा जिल्हा परिषदेचे इतिवृत्त, सभांची माहिती, विविध विषय संग्रह, पत्रव्यवहार, आत्मपरिचय, सुबोध वचने या विविध सदरांबरोबरच 'आजकालचे प्रश्न' या विषयावरही संपादकाचे विचारमंथन छापले जात असे. बाबासाहेबांचे अग्रलेखातून तर्कशुद्ध विचारांचे खंडन मंडन, युक्तिवाद, समर्थक सुभाषिते, अवतरणे, डौलदार व आवेशपूर्ण भाषा इ. बरोबरच कोणत्याही विषयाची सर्व बाजूने चिकित्सा केलेली असे. काही लेखातून त्यांनी जहालवादी व हिंदू धर्मातील सामाजिक प्रथांवर टिका केली. अस्पृश्यांवर होणारे अन्याय–जुलूम पाहिला व अनुभवल्यामुळे अस्पृश्यांची बाजू मांडतांना बाबासाहेब आक्रमक होतात. महाडच्या सत्याग्रहाच्या वेळी 'बहिष्कृत भारत' ने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. मात्र वृत्तपत्राला वर्गणीदार फारसे न मिळाल्यामुळे, बाबासाहेबांनी वर्गणीदार व्हावे असे आवाहन करून देखील त्याचा फारसा परिणाम झाला नाही. त्यामुळे 15 नोव्हेंबर 1929 चा अंक काढून आर्थिक अडचणीमुळे बहिष्कृत भारत बंद पडले. तरी बाबासाहेबांच्या सर्व पत्रात बहिष्कृत भारत हे वृत्तपत्र महत्त्वाचे ठरले.

**3) जनता :**

'मूकनायक' व 'बहिष्कृत भारत' ही दोन्ही वृत्तपत्रे अल्पायुषी ठरलीत. पण 24 नोव्हेंबर 1930 रोजी सुरू केलेले 'जनता' हे वृत्तपत्र दीर्घकाळ चालले. या पत्राचे प्रथम संपादक म्हणून देवराम विष्णू नाईक या पुरोगामी विचारांच्या, अस्पृश्यांच्या चळवळीत सक्रीय सहभाग घेणाऱ्या ब्राह्मण कार्यकर्त्याने काम पाहीले. सुरूवात पाक्षिक म्हणून झाली असली तरी पुढे साप्ताहिक म्हणूनच निघू लागले. जनताच्या शीर्षभागी ''डॉ. भीमराव आंबेडकर, एम.ए., पीएच.डी., बार ॲट लॉ यांच्या नेतृत्वाखाली निघणारे पाक्षिक'' असे असून 'जनता' या अक्षराखाली 'द पीपल' असे लिहिलेले असे. अस्पृश्य व पददलितांची दुःखे निर्भिडपणे मांडण्याची हमीच 'जनता' या वृत्तपत्राने दिली होती. या पत्राचे विशेष हे की, काही अंकानंतर शीर्षकाच्या मध्यभागी ''गुलामाला तू गुलाम आहेस असे सांगा म्हणजे तो बंड करून उठेल'' हे ब्रीद वाक्य लिहीलेले असे.

बाबासाहेबांना असलेल्या इतर व्यापामुळे जनतात त्यांना सतत लिहीता आले नाही याची खंत त्यांना वाटत असे. तर्.ही सामाजिक व शैक्षणिक प्रश्नांवर जेवढा भर होता तेवढाच धर्मांतराच्या संदर्भातील विचार त्यांनी जनतामध्ये प्रभावीपणे मांडले. या प्रश्नावर बाबासाहेबांनी वाचकांसाठी विलायतेतून लिहिलेली पत्रे ही वाचनीय असून तो त्यांचा एक दस्तऐवजच आहे. 'जनता' जगवले पाहीजे अशी त्यांची इच्छा होती. म्हणूनच जनताचे स्वरूप व धोरणाविषयी ते वेळोवेळी मार्गदर्शन करत असत. राजकीय लढ्यासाठी व आपल्या स्वावलंबनासाठी आपले वर्तमानपत्रे भरभराटीस आणले पाहिजे. आज जरी त्याची किंमत फारशी वाटत नसली तरी भविष्यात त्याची जाणीव नक्कीच होईल अशी आंतरिक इच्छा बाबासाहेबांची होती. जनता पत्राचे आयुष्य 25 वर्षांचे असले तरी ते सलग कार्यरत नसून खंडीत होतांना दिसते. 1955 पर्यंत विविध संपादकांच्या संपादनाखाली 'जनता'ची वाटचाल सुरू होती. भा.र. कद्रेकर, गं.नी. सहस्त्रबुद्धे, बी.सी. कांबळे, यशवंत आंबेडकर या संपादकांनी हे वृत्तपत्र चालवले.

**4) प्रबुद्ध भारत :**

4 फेब्रुवारी 1956 रोजी 'जनता' चे 'प्रबुद्ध भारत' असे नामांतर करण्यात आले. बाबासाहेबांच्या निर्वाणानंतर 'प्रबुद्ध भारत' यशवंत आंबेडकर, मुकुंदराव आंबेडकर, दा.ता.रूपवते, शंकरराव खरात, भा.र. कद्रेकर इ.च्या संपादनाखाली चालवले जात होते. पुढे अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाची स्थापन झाल्यावर 'प्रबुद्ध भारत' हे रिपब्लिकन पक्षाचे मुखपत्रच बनले होते. परंतु संपादक मंडळ व राजकीय नेत्यांमध्ये बेबनाव निर्माण झाला. त्याचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष परिणाम 'प्रबुद्ध भारत'वर झाला. या वृत्तपत्रासाठी स्वतंत्र मुद्रणालय असून देखील 1961 साली हे वृत्तपत्र बंद पडले, ही दुःखद बाब ठरली.

## निष्कर्ष :

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक, सांस्कृतिक व राजकिय जीवनाचा प्रवास मूकनायक ते प्रबुद्ध भारत या वृत्तपत्रांच्या माध्यमातून झालेला आहे.

अस्पृश्यांच्या चळवळींच्या इतिहासात त्यांच्या वृत्तपत्रांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. कारण त्यांनी सुरू केलेली ही वृत्तपत्रे त्या काळाची गरज होती.

देशातील विविध चळवळी, घटना, घडामोडींचे भान ठेऊनच समाजस्थिती बदलण्यासाठी बाबासाहेबांनी या पत्रांच्या माध्यमातून जनजागृती केली होती.

वैचारिक अंधारात चाचपडणाऱ्या समाजमनाला नवी दृष्टी, नवा विचार व दिशा देण्याचे कार्य या वृत्तपत्रांच्या माध्यमातूनच करता आले.

बाबासाहेबांच्या डोळ्यापुढे फक्त अस्पृश्य समाजच नव्हता तर हिंदू समाजातील सामाजिक परिवर्तने, पुनर्रचनेचे आणि नव्या जगाचे चित्र निर्माण करायचे असल्याने समाज जीवनात विचारक्रांती निर्माण करून नवा. समाज उभा करण्यासाठी वृत्तपत्रे हे मौलीक माध्यम असल्याने बाबासाहेबांनी वृत्तपत्रे सुरू केलीत व ती चालवलीत. म्हणूनच बाबासाहेबांचे वृत्तपत्रीय कार्य महत्त्वपूर्ण आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

1) डॉ.गंगाधर पानतावणे – पत्रकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर, प्रतिमा प्रकाशन, पुणे, 1996

2) डॉ.एस.एस.गाठाळ – आधुनिक भारतातील सामाजिक–धार्मिक सुधारणा चळवळी, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, जून 2011

3) य.दि.फडके – आंबेडकरी चळवळ, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, फेब्रुवारी 1990

4) द.न. गोखले – डॉ. आंबेडकरांचे अंतरंग, मौज प्रकाशन, मुंबई, जानेवारी 2003

---

**(मराठी विभाग प्रमुख)**

**विद्या विकास मंडळाचे, कला व वाणिज्य महाविद्यालय,**

**अक्कलकुवा जि.नंदुरबार–425415**